१६०१

महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र.-२२२६ दि.-२८-१२-१७.

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

**दिनांक – २७/१२/२०१७** **दिनांक – दुपारी ०३.३० वा.**

**स्थळ** – महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,
**श्री. मोहन विश्वनाथ गायकवाड**
स.नं.१३२, राजीव गांधीनगर, पर्वती पायथा,
सानेगुरूजी शाळेसमोर, सिंहगड रोड, पुणे ३०.
} **अपिलार्थी**

**श्री. सुरेंद्र वाळके**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
} **जनमाहिती अधिकारी तथा** उप अधिक्षक

**माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

श्री. मोहन विश्वनाथ गायकवाड (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक १०/११/२०१७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक १०/११/२०१७ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत हॉकर्स झोनची माहिती विचारलेली होती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| १०/११/२०१७ | १०/११/२०१७ | ०९/१२/२०१७ | २०/११/२०१७ | – |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती समाधानकाररित्या न मिळाल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक ३०/११/२०१७ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| ३०/११/२०१७ | ३०/११/२०१७ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ – दि.२७/१२/२०१७ रोजी दुपारी ०३.३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता – उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी व सहा. जनमाहिती अधिकारी – उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील –**

| माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|
| १) पुणे महानगरपालिका भारत सरकारच्या फेरीवाला धोरणा नुसार राबवीत असलेली दि स्ट्रीट व्हेंडर्स प्रोटेक्शन ऑफ लाईव्हलिहुड ॲण्ड रेग्युलेशन ऑफ स्ट्रीट व्हेंडींग अधिनियम २०१४ ची प्रतीसह माहिती मिळावी. | सदरची माहिती www.punecorporation.org-Department-Encrochment या वेबसाईटवर उपलब्ध आहे. |
| २) सदर फेरीवाला धोरणानुसार सर्व्हे प्रमाणे स्वामी विवेकानंद पुतळा, आण्णाभाउ साठे नाट्यगृह लगत, बिबवेवाडी, सातारा | |

| | |
|---|---|
| रोड, पुणे येथील अधिकृत फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र असलेले व्यवसायीक त्याची वर्गवारी नुसार नावासहीत प्रतीसह माहिती मिळावी. | |
| ३) सदर फेरीवाला धोरणानुसार स्वामी विवेकानंद पुतळा, आण्णाभाऊ साठे नाट्यगृह लगत, बिबवेवाडी, सातारा रोड, पुणे येथील अधिकृत हॉकर्स झोन ची माहिती मिळावी तसेच आज पर्यंत कशा प्रकारे कार्यवाही केलेली आहे. तसेच पुढिल मनपाचे हॉकर्स झोन बाबत काय धोरण आहे याची माहिती मिळावी. | सदर बाबत सद्यस्थितीत कार्यवाही चालू असून त्याबाबत अधिकृत दस्त स्वरूपात कागदपत्रे तयार झालेली नाहीत. त्यामुळे सदर दस्त स्वरूपाचे कागदपत्रे उपलब्ध करून देणे शक्य नाही. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक २७/१२/२०१७ रोजी दुपारी ०३.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.मोहन विश्वनाथ गायकवाड हे उपस्थित होते. सदर दिनांकास श्री.सुरेंद्र वाळके जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकार तथा सहाय्यक अतिक्रमण निरिक्षक श्री.सुभाष जगताप हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री.मोहन विश्वनाथ गायकवाड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जाची माहिती समाधानकाररित्या न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

वरीलप्रमाणे संबंधित सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'</u>**

➢ जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या मुद्दा क्र.१ अंतर्गत विचारलेल्या माहितीच्या प्रती, मुद्दा क्र.२ अंतर्गत अर्जात नमूद ठिकाणी फेरीवाला नोंदणी धोरणा अन्वये आजअखेर नोंदणी केलेल्या व्यवसायिकांची वर्गवारीनुसार यादीची प्रत व मुद्दा क्र.३.४ अंतर्गत विचारलेल्या माहितीची पुणे मनपाचे हॉकर्स झोन पुनर्वसनाबाबत असणाऱ्या धोरणाची कार्यालयीन परिपत्रके इत्यादी माहिती अपिलार्थी श्री.मोहन विश्वनाथ गायकवाड यांना पुढिल ८ दिवसात अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जाची माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी

कळावे,

28/12/17

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

<u>टिप –</u>

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे – ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत –

१. श्री.मोहन विश्वनाथ गायकवाड, स.नं.१३२, राजीव गांधीनगर, पर्वती पायथा, सानेगुरुजी शाळेसमोर, सिंहगड रोड, पुणे ४११०३०.
२. श्री.सुरेंद्र वाळके जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
३. श्री.सुभाष जगताप सहा.जनमाहिती अधिकारी तथा सहा. अतिक्रमण निरिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.